जिल्हा वार्षिक योजना सन २०१०-११
अंतर्गत राबवावयाच्या योजनांबाबत
(सर्वसाधारण योजना)
एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. जिवायो-२०१०/प्र.क्र.३१२/पदुम-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१०

वाचा : १. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.कुक्कुट/१०९०/२७२००/सीआर-२५२/ पदुम-४, दि. ११.१.१९९१.
२. शासन निर्णय क्र.कुक्कुट-१०९७/१४६०४/प्र.क्र.९३/९७/पदुम-४, दि. ४.१२.१९९८
३. शासन नियोजन विभागाचे पत्र क्र.जिवायो-१००९/प्र.क्र.२१३/का.१४८१ मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ३० डिसेंबर, २००९.

शासन निर्णय :

तलंगा गट वाटप या योजनेसंदर्भात वाचा येथील १ व २ वरील शासन निर्णय अधिक्रमित करून जिल्हा वार्षिक योजने (सर्वसाधारण योजना) अंतर्गत एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम ही योजना सन २०१०-११ पासून राज्यात राबविण्यास याद्वारे शासनाची प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. या योजने अंतर्गत खालील कार्यक्रम राबविण्यात यावेत.

अ. तलंगा गट वाटप

१. या कार्यक्रमाअंतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५०% अनुदानावर ८ ते १० आठवडे वयाच्या तलंगांच्या २५ माद्या आणि ३ नर याप्रमाणे गटाचे वाटप करण्यात यावे.

२. तलंगाच्या एका गटाची (२५ माद्या+३ नर) एकूण किंमत रू ६०००/- मंजूर करण्यात येत आहे. तलंगाच्या एका गटाचा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| पक्षी किंमत (२५ माद्या+३ नर) | रू ३०००/- |
| खाद्यावरील खर्च | रू १४००/- |
| वाहतूक खर्च | रू १५०/- |
| औषधी | रू ५०/- |
| रात्रीचा निवारा | रू १०००/- |
| खाद्याची भांडी | रू ४००/- |
| एकूण | रू ६०००/- |

त्यापैकी ५०% अनुदानातून रू ३०००/- मर्यादेत प्रतिलाभार्थी एका तलंगांच्या गटाचा पुरवठा करण्यात यावा. उर्वरित ५०% रक्कम म्हणजेच रू ३०००/- लाभार्थ्याने स्वतः उभारून त्यातून तलंगांच्या गटासाठी लागणारा निवारा, वाहतुकीवरील खर्च, खाद्यावरील खर्च, औषधी, पाण्याची भांडी, खाद्याची भांडी इ. वरील खर्च करावा.

ब. एकदिवशीय सुधारित कुक्कुट पक्षांच्या पिल्लांचे गट वाटप

या कार्यक्रमाअंतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५०% अनुदानावर प्रति लाभार्थी एक दिवसीय सुधारित कुक्कुट पक्ष्यांच्या (आयआयआर, ब्लॅक ॲस्ट्रालॉर्प, गिरीराज, वनराज, कडकनाथ व इतर शासन मान्य जातींचे पक्षी) १०० पिल्लांचे गट वाटप करण्यात यावेत. एका गटाची (१०० एक दिवसीय पिल्लांची) एकूण किंमत रू.१४०००/- मंजूर करण्यात येत आहे. एका गटाच्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एक दिवशीय १०० पिल्लांची किंमत | रू २०००/- |
| प्रत्येक गटाबरोबर द्यावयाचे खाद्य ८०० किलोग्रॅम | रू १२४००/- |
| वाहतूक खर्च | रू १००/- |
| औषधी | रू १५०/- |
| रात्रीचा निवारा | रू १०००/- |
| खाद्याची भांडी | रू ३५०/- |
| एकूण | रू १६०००/- |

त्यापैकी ५०% अनुदानातून रू ८०००/- मर्यादेत प्रतिलाभार्थी एकदिवसीय १०० पिल्ले (किंमत रू २०००/-) आणि खाद्य (रू ६०००/- किंमतीच्या मर्यादेत) पुरवठा करण्यात यावा. उर्वरित ५०% रक्कम म्हणजेच रू ८०००/- लाभार्थ्याने स्वतः उभारून त्यातून एकदिवसीय १०० पिल्लांच्या गटासाठी लागणारा निवारा, वाहतुकीवरील खर्च, उर्वरित खाद्यावरील खर्च, औषधी, पाण्याची भांडी, खाद्याची भांडी इ. वरील खर्च करावा.

तलंगा गट वाटप योजना व एक दिवसीय सुधारित कुक्कुट पक्षांच्या पिल्लांचे गट वाटप योजना कार्यान्वित करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे.

१. सदर योजनेचा लाभ कोणत्याही गटातील लाभार्थी घेऊ शकतील. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात यावा.
२. अंमलबजावणी अधिकाऱ्याने योजनेस व्यापक प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात यावेत.
३. योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्याने करावयाचा अर्जाचा नमुना तालुका पशुसंवर्धन कार्यालयात, जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयात, जिल्हाधिकारी कार्यालयात व वेबसाईटवर उपलब्ध असावा.
४. लाभार्थी निवडताना ३०% महिला लाभार्थी निवडण्याबाबत प्राधान्य देण्यात यावे.
५. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी अर्ज स्विकारून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत जिल्हा निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करावे.
६. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, भुमीहीन शेतमजूर, मागासवर्गीय, अल्प व अत्यल्प भूधारक लाभार्थी यांना प्राधान्य देण्यात यावे.
७. अर्ज स्वीकारण्यासाठी ३०-४५ दिवसाची मुदत देण्यात यावी. या मुदतीनंतर अर्ज स्विकारू नये. सदर अर्जातील वैधता ही चालू आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेच्या अधिन असेल तसेच कोणत्याही स्वरूपात सदरील अर्ज पुढील आर्थिक वर्षासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून एका महिन्याच्या कालावधीत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

लाभार्थी निवड समिती

| | |
|---|---|
| जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | अध्यक्ष |
| सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र किंवा पशुधन विकास अधिकारी सघन कुक्कुट विकास गट | सदस्य |
| महिला व बाल कल्याण अधिकारी | सदस्य |
| समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी | सदस्य |
| जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य सचिव |

ज्या जिल्ह्यात मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र किंवा सघन कुक्कुट विकास गट नाहीत अशा ठिकाणी नजिकच्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र किंवा सघन कुक्कुट विकास गटाच्या अधिकाऱ्याचा समितीमध्ये सदस्य म्हणून समावेश करण्यात यावा.

८. संबंधीत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निधी उपलब्धतेच्या अधिन राहून मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र/सघन कुक्कुट विकास गट यांचेकडे एक दिवशीय पिल्ले व तलंगा गटाची मागणी नोंदवावी.

९. मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र/सघन कुक्कुट विकास गट यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद यांचे मागणीनुसार एक दिवशीय पिल्लांची निर्मिती करावी. तसेच तलंगा गट पुरवठा करण्यासाठी ८ ते १० आठवडे वयापर्यंत पक्षी वाढवावेत.

१०. तलंगा गट संगोपनासाठी येणारा खर्च गटाच्या ५०% अनुदान रकमेतून (तलंगा प्रतिगट अनुदान ५०% रक्कम रू ३०००/-) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अधिपत्याखालील संबंधित सघन कुक्कुट विकास गटाने करावा. सघन कुक्कुट विकास गट नसलेल्या जिल्ह्याने नजीकच्या जिल्ह्यातील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे तलंगा गट संगोपनासाठी येणाऱ्या खर्चाची ५०% अनुदानाची रक्कम संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे धनाकर्षाद्वारे अदा करावी.

११. एकदिवशीय पिल्लांचे गट वाटप या योजनेच्या अंमलबजावणीसाठी गटाच्या ५०% अनुदान रक्कमेपैकी एकदिवशीय पिल्लांसाठीची रक्कम रू २०००/- याप्रमाणे एकूण गटांची रक्कम जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र यांचेकडे धनाकर्षाद्वारे अदा करावी. सदर रकमेतून एक दिवसाच्या पिल्ले निर्मितीचा खर्च संबंधित मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्राने भागवावा. अशाप्रकारे मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्राद्वारे संबंधित जिल्ह्यामध्ये लक्षांकित लाभार्थ्यांना एकदिवशीय पिल्लांचे गट पुरवठा केले जातील त्याचवेळी जिल्हा परिषदेने संबंधित लाभार्थ्यांना गटासाठी द्यावयाचे खाद्य (रू. ६०००/- किंमतीच्या मर्यादेमध्ये) वेळेतच पुरवठा करण्याची दक्षता घ्यावी.

१२. मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र/सघन कुक्कुट विकास गटाकडे जर एकदिवशीय पिल्ले/वाटप करावयाचे तलंगाचे गट उपलब्ध नसल्यास/उपलब्ध होवू शकत नसल्यास, वर नमूद केलेल्या खर्चाच्या प्रमाणकांच्या अधिन राहून केंद्र शासनाच्या संस्था/खाजगी संस्था यांचेकडून वर उल्लेख केलेल्या जातींची एकदिवशीय कुक्कुट पिल्ले/तलंगाचे गट खरेदी करून गट वाटप करण्यात यावेत. खाजगी संस्थांकडून अशी खरेदी करत असताना विहित शासकीय कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात यावा.

१३. तलंगाच्या एका गटास प्रति लाभार्थी अनुदानाची ५०% रक्कम रू ३०००/- कमाल मर्यादेपेक्षा जास्त नसावी. तलंगा गट वाटपाचा खर्च गटाच्या निर्धारित किंमतीपेक्षा जास्त झाल्यास सदरचा वाढीव खर्च लाभार्थीने स्वतः करावा.

१४. लाभार्थींची निवड झाल्यानंतर संबंधीत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पंचायत समिती/संबंधीत पशुवैद्यकीय दवाखान्याचे मार्फत लाभधारकास एक दिवशीय पिल्ले/तलंगा गट वाटप करावे.

१५. एक दिवशीय पिल्ले/तलंगा गट वाटप करताना विशेषतः मॅरेक्स, राणीखेत आणि देवी रोगांवरील लसीकरण झाले आहे याची दक्षता घ्यावी.

१६. एक दिवशीय १०० पिल्लांसाठी प्रति लाभार्थी अनुदानाची ५०% रक्कम रू ८०००/- च्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त नसावी. एक दिवशीय १०० पिल्लांच्या गटाचा खर्च गटाच्या निर्धारित किंमतीपेक्षा जास्त झाल्यास सदरचा वाढीव खर्च लाभार्थीने स्वतः करावा.

१७. योजने अंतर्गत वाटप केलेल्या कुक्कुट पक्षांना राणीखेत, देवी प्रतिबंधक लसीकरणाच्या सुविधा नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत उपलब्ध करून द्याव्यात. तसेच एक दिवशीय पिल्लांच्या ब्रुडींग संदर्भात व कुक्कुट पालनासंदर्भात लाभार्थ्यांना माहिती देण्यात यावी व वेळोवेळी मार्गदर्शन करावे.

१८. नियोजन विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का.१४४४, दि. १६.२.२००८ नुसार या योजनेस जिल्हा परिषदेची प्रशासकीय मंजूरी घेण्यात यावी.

१९. कुक्कुट खाद्याची खरेदी विभागाच्या दरकरारानुसार करण्यात यावी. दरकरार उपलब्ध नसल्यास विहित शासकीय कार्यप्रणालीचा अवलंब करून खाद्याची खरेदी करण्यात यावी.

२०, या योजनेमध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अभिलेखे ठेवावेत. पक्षांचे अंडयावर येणारे वय, त्यांच्यापासून मिळालेले एकूण व सरासरी अंडी उत्पन्न इ. बाबतच्या नोंदी नजिकच्या पशुवैद्यकीय संस्थेकडे ठेवाव्यात व या उपयोजनेचा फलश्रुती अहवाल विस्तार अधिकाऱ्यामार्फत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी संकलीत करून प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचेमार्फत आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करावा.

२१. या योजनेंतर्गत एकदा लाभार्थीची निवड झाल्यावर, त्या लाभार्थ्याचा या योजनेकरीता किमान पुढील पाच वर्षे पुनःश्च विचार करण्यात येऊ नये.

२२. या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद हे राहतील.

२३. जिल्हास्तरावर या योजनेचे सनियंत्रण जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे करतील. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त व अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन हे या योजनेचे अनुक्रमे विभागीय व राज्यस्तरीय सनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

२४. जिल्हा सर्वसाधारण योजनेत सदर उपयोजनेसाठी २४०३-पशुसंवर्धन या लेखाशिर्षाअंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबी अंतर्गत अनुदानाचा निधी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावित करावा.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६०२२/का-१४३१, दिनांक २३.८.२०१० अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५२४/१०/व्यय-२, दिनांक १.९.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१००९१७१४०४३१००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

( प्रणाली चिटणीस)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत -

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती (सर्व )
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)
नियोजन विभाग, (का-१४३१), मंत्रालय, मुंबई-३२.
वित्त विभाग (का-व्यय-२), मंत्रालय, मुंबई-३२.
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र ( सर्व )
जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
अवर सचिव (पदुम-३/१६), कक्ष अधिकारी (पदुम-१/१अ), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती

-------

एच-२३५५[ ५००-९-१०]-३.